# संचालक, फलोत्पादन कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००५

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

**'' मार्गदर्शक सुचना ''**

**विषय - राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मँगोनेट, व्हेजनेट, ग्रेपनेट, अनारनेट व फायटोसॅनिटरी ॲथारिटी यांचे बळकटीकरण याद्वारे निर्यातीस प्रोत्साहन देणे योजना सन २०१५-१६ साठी मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ** – **१.** शासन निर्णय क्र. राकृवि ०६१४/प्र.क्र. ३५/ राकृवियो कक्ष, मुंबई दि. ०७.०७.२०१४
**२.** राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची १८ वी बैठक दि. ०५.०७.२०१४
**३.** मा. आयुक्त, कृषि यांचे आदेश क्र. नियोजन/प्र.क्र. ५२/राकृवियो/निधी/१४-१५/७७/२०१४ दि. २२.०७.२०१४

महाराष्ट्र राज्य ताजी फळे व भाजीपाला निर्यातीमध्ये भारतात आघाडीवर आहे. युरोपीय युनियनला निर्यात होणा-या फळे व भाजीपाल्यामध्ये कीडींचा प्रादुर्भाव असल्याचे आढळून आल्याने त्यांनी काही उत्पादनांच्या आयातीवर तात्पुरती बंदी आणलेली आहे. त्यामुळे सन २०१५-१६ मध्ये राज्यामध्ये ग्रेपनेटच्या धर्तीवर मँगोनेट व व्हेजनेट (भेंडी) या दोन प्रणाली विकसित करावयाच्या आहेत. तसेच अनारनेट व फायटोसॅनिटरी प्रमाणीकरण यंत्रणा बळकट करणे आवश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मँगोनेट, व्हेजनेट, ग्रेपनेट, अनारनेट व फायटोसॅनिटरी ॲथारिटींचे बळकटीकरणद्वारे निर्यातीस प्रोत्साहन देणे ही योजना सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये राबविण्यास मान्यता दिली आहे. सदर योजनेसाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रू. ५०.०० लाख निधी मंजूर होता तर सन २०१५-१६ साठी रक्कम रू. ५०.०० लाख निधी मंजूर झालेला आहे.

**योजनेचे उद्देश**

१. व्हेजनेट ( चालु वर्षी फक्त भेंडी पिकासाठी ) व मँगोनेट या प्रणाली विकसित करून परदेशी ग्राहकांना परीपूर्ण ट्रेसॅबिलीटी उपलब्ध करून देणे
२. ग्रेपनेट व अनारनेट या प्रणालींचे बळकटीकरण करून निर्यातीस चालना देणे
३. राज्यातील कीडरोग मुक्त कृषि उत्पादन प्राधिकारी ( फायटोसॅनिटरी ॲथारिटी ) यांचे बळकटीकरण करणे
४. निर्यात विषयक कामासंबंधीचे मनुष्यबळ प्रशिक्षित करणे
५. राज्यातून कृषि मालाच्या निर्यातीस प्रोत्साहन देणे

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

**योजना राबविणारे जिल्हे**

- **कोंकण विभाग** - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,

  **नाशिक विभाग** - नाशिक, जळगाव,

  **पुणे विभाग** - पुणे, अहमदनगर, सोलापूर,

  **कोल्हापूर विभाग** - सातारा, सांगली,

  **औरंगाबाद विभाग** – औरंगाबाद, बीड, जालना

  **लातूर विभाग** - उस्मानाबाद, लातूर, परभणी

  **अमरावती विभाग** - बुलढाणा, अमरावती,

**पीकनिहाय / विषयनिहाय योजना अंमलबजावणी करणारे जिल्हे**

- **ग्रेपनेट** - नाशिक, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा , सांगली, बीड, जालना, उस्मानाबाद, लातूर, औरंगाबाद, बुलडाणा (१३ जिल्हे)

- **अनारनेट** - नाशिक, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, लातूर, परभणी, बुलढाणा (१४ जिल्हे)

- **व्हेजनेट (भेंडी)** - ठाणे, नाशिक, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, बीड, लातूर (१० जिल्हे)

- **मँगोनेट** - रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर, ठाणे, नाशिक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, लातूर, बुलडाणा (१५ जिल्हे)

- **फायटोसॅनिटरी ॲथारिटी** - नाशिक, पुणे, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, अमरावती. (७ जिल्हे)

  **१. नाशिक, सोलापूर, सांगली जिल्हे**– जि.अ.कृ.अ कार्यालयातील कृषि उपसंचालक व कृषि अधिकारी असे दोन फायटोसॅनिटरी प्राधिकारी आहेत.

  **२. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अमरावती जिल्हे** - जि.अ.कृ.अ कार्यालयातील कृषि उपसंचालक हे फायटोसॅनिटरी प्राधिकारी आहेत.

  **३. पुणे येथे कृषि आयुक्तालयातील** - संचालक, फलोत्पादन अधिनस्त कृषि उपसंचालक (फलो ३) तसेच संचालक ( विस्तार व प्रशिक्षण) अधिनस्त कृषि अधिकारी ( पीक संरक्षण) हे फायटोसॅनिटरी प्राधिकारी आहेत.

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

**सन २०१५-१६ साठीचा कार्यक्रम**

सदर योजनेंतर्गत सन २०१५-१६ साठीचा भौतिक व आर्थिक कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | घटक/बाब | प्रमाणके | अंमलबजावणीचा स्तर | भौतिक लक्ष (संख्या) प्रशिक्षण | आर्थिक लक्ष (रू. लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १ अ | शेतकरी/अधिकारी प्रशिक्षण | रू. ०.२५ लाख प्रती प्रशिक्षण | तालुका/जिल्हा/विभाग स्तर | २० | ५.०० |
| १ ब | तपासणी अधिकारी कार्यशाळा | रू. २.०० लाख प्रती कार्यशाळा | जिल्हा/विभाग/आयुक्तालय स्तर | ५ | १०.०० |
| २ अ | फायटोसॅनिटरी ॲथारिटींचे प्रशिक्षण | रू. ०.२५ लाख प्रती प्रशिक्षण | आयुक्तालय स्तर | २ | ०.५० |
| २ ब | फायटोसॅनिटरी ॲथारिटींसाठी उपकरणे व पायाभूत सोयीसुविधा | रू. १.०० लाख प्रती ॲथारिटी | जिल्हास्तर/ आयुक्तालय स्तर | ७ | ७.०० |
| ३ | प्रकाशने, प्रशिक्षण साहित्य, छपाई इ. | -- | जिल्हास्तर/ आयुक्तालय स्तर | -- | ५.०० |
| ४ | तपासणी अधिका-यांना फिरती, स्टेशनरी इ. विविध सुविधांसाठी रक्कम | रू. १०.०० प्रती द्राक्षबाग नोंदणी व ४ ब तपासणी पूर्ण | जिल्हास्तर | २०००० द्राक्षबागा | २.०० |
| ५ | नोंदणी व तपासणी अधिका-यांसाठी आयटी सुविधा | संगणक, प्रिंटर, स्कॅनर, कनेक्टीव्हीटी, टॅब पामटॅाप, लॅपटॅाप, इ. | जिल्हास्तर/ आयुक्तालय स्तर | --- | १९.५० |
| ६ | आकस्मिक व इतर | प्रिंटींग, झेरॅाक्सिंग, उपकरणांचे देखभाल शुल्क इ. | जिल्हास्तर/ आयुक्तालय स्तर | -- | १.०० |

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल — phytocell@gmail.com

**मँगोनेट, व्हेजनेट (भेंडी), अनारनेट प्रणाली**

**मँगोनेट, व्हेजनेट (भेंडी), अनारनेट** यांचे किडनाशक उर्वरित अंश सनियंत्रण योजना (रिसिड्यू मॉनिटरींग प्लॅन - आरएमपी ) अपेडाने अंतीम केल्यानंतर आपणास त्याबाबत विस्तृत मार्गदर्शक सूचना तसेच आरएमपी डॉक्युमेंट, नोंदणी अधिकारी, तपासणी अधिकारी नियुक्तीचे आदेश पाठविण्यात येतील. तथापि अपेडाकडून आरएमपी डॉक्युमेंट व सॉफ्टवेअर अंतीम होईपर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- निर्यातक्षम बागेची / शेताची नोंदणी करण्याकरिता अर्जदारांकडून विहीत प्रपत्रामध्ये अर्ज (सोबत प्रपत्र १, २, ३) भरून घ्यावेत. सध्या अर्जासोबत कोणतीही फी / चलन आकारू नये.
- अर्जासोबत बागेचा / शेताचा स्थळदर्शक नकाशा व गाव नमूना नं. सात व बारा या उता-याची प्रत जोडणे आवश्यक आहे.
- निर्यातक्षम बागांची / शेताची नोंदणी वेळेत करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्र, आकाशवाणी तसेच दूरदर्शनवरून प्रसिध्दी देण्यांत यावी.
- तसेच निर्यातक्षम उत्पादन करणा-या शेतक-यांच्या तालुका स्तरावर माहे सप्टेंबर २०१४ मध्ये बैठका आयोजित करून युरोपीयन देशांना निर्यात करू इच्छिणा-या शेतक-यांना त्यांचे बागेची / शेताची नोंदणी करण्याकरिता मार्गदर्शन करावे. खास मोहिम घेऊन सर्व अर्ज संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात स्वीकारण्याची व्यवस्था करावी. प्राप्त झालेल्या अर्जांवरून शेतक-यांची यादी तयार करून ती कृषि आयुक्तालयास सादर करावी.

**ग्रेपनेट प्रणाली**

ग्रेपनेटवरील द्राक्ष बागांच्या नोंदणीसाठी दरवर्षीप्रमाणे अपेडाने आरएमपी अंतीम केल्यानंतर विस्तृत तांत्रिक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील. तोपर्यंत याबाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- युरोपीयन देशांना द्राक्ष निर्यात करू इच्छिणा-या द्राक्ष बागायतदारांनी त्यांच्या द्राक्ष बागेची नोंदणी / नोंदणीचे नुतनीकरण संबधित जिल्हयाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयाकडे **दिनांक १ सप्टेंबर, २०१५ ते ३० नोव्हेंबर २०१५** या कालावधीत करावयाची आहे.
- निर्यातक्षम द्राक्ष बागेची नोंदणी / नुतणीकरण करण्याकरिता अर्जदारांकडून विहीत प्रपत्रामध्ये अर्ज व फी रू ५०/- चलनाद्वारे खालील लेखाशिर्षामध्ये भरून घ्यावी.

  **लेखाशिर्ष -**

  ०४०१ पीक संवर्धन,

  १०७, रोपसंरक्षण सेवांपासून मिळणा-या जमा रकमा,

  (०१) रोपसंरक्षण सेवांपासून मिळणा-या जमा रकमा,

(०१) (०१) रोपसंरक्षण योजनेखाली मिळणा-या जमा रकमा
(०४०१ ०१९७)

- अर्जासोबत बागेचा स्थळदर्शक नकाशा व गाव नमूना नं. सात व बारा या उता-याची प्रत जोडणे आवश्यक आहे.
- निर्यातक्षम द्राक्ष बागांचे नुतणीकरण / नवीन नोंदणी वेळेत करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्र, आकाशवाणी तसेच दूरदर्शनवरून इ.विविध प्रसिध्दी माध्यामांव्दारे प्रसिध्दी देण्यांत यावी.
- निर्यातक्षम द्राक्ष बागायतदारांची तालुका स्तरावर माहे सप्टेंबर २०१५ मध्ये बैठका आयोजित करून युरोपीयन देशांना द्राक्ष निर्यात करू इच्छिणा-या द्राक्ष बागायतदारांना त्यांचे बागेची नुतणीकरण / नवीन नोंदणी करण्याकरिता मार्गदर्शन करावे. खास मोहिम घेऊन सर्व अर्ज तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात स्वीकारण्याची व्यवस्था करावी. प्राप्त झालेले अर्जाचे नुतणीकरण / नवीन नोंदणी करण्याकरिता अपेडाच्या वेबसाईटवर अद्यावत करण्याची कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरून निर्यातक्षम द्राक्ष बागांचे नुतणीकरण वेळेत करून शेतक-यांना नोंदणी प्रमाणपत्र त्वरीत उपलब्ध करून देणे शक्य होईल.
- सदर कामाकरिता तालुका स्तरावर एका स्वतंत्र कर्मचा-याची नियुक्ती करून सदरचे काम प्राधान्याने करावे.
- सदरची **सर्व प्रपत्र http://apeda.gov.in या संकेतस्थळावर हार्टनेट /ग्रेपनेट या लिंकवर** उपलब्ध आहेत.
- द्राक्ष बागांची तपासणी करण्याकरिता नियुक्त करावयाच्या तपासणी अधिका-यांची नांवे, पदनाम, कार्यालयाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल व त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या नोंदणीकृत द्राक्ष बागांची संख्या याची माहिती **इंग्रजी भाषेत** तात्काळ कृषि आयुक्तालयास ईमेलद्वारे ( phytocell@gmail.com) या मेल वर ३१ ऑगस्ट, २०१५ पर्यंत कळवावी. सदरची यादी अपेडाच्या ग्रेपनेट वेबसाईटवर दरवर्षी प्रसिध्द करावी लागते.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मँगोनेट, व्हेजनेट, ग्रेपनेट, अनारनेट, फायटोसॅनिटरी ॲथारिटी यांचे बळकटीकरण याद्वारे निर्यातीस प्रोत्साहन देणे या योजनेची अंमलबजावणी करताना खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा.

**बाब क्र. -१ अ – शेतकरी प्रशिक्षण.**

निर्यातक्षम द्राक्ष, डाळिंब, आंबा व भाजीपाला उत्पादनाची निर्यात वाढण्यासाठी आयातदार देशांना रिसिड्यू मॉनिटरींग प्लॅनच्या माध्यमातून किडरोग व किडनाशक उर्वरित अंश मुक्त शेतीमालाची हमी देणे आवश्यक आहे.

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

यासाठी निर्यात करु शकणा-या संबंधित शेतक-यांचे प्रशिक्षण आयोजित करून त्यांना निर्यातक्षम उत्पादनासाठी आवश्यक अद्ययावत तंत्रज्ञान देणे आवश्यक असते. यासाठी जिल्हयांनी त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये निर्यातक्षम द्राक्ष, आंबा, डाळिंब किंवा भाजीपाला ( भेंडी) पिकविणा-या शेतक-यांचे एक प्रशिक्षण आयोजित करावे. यासाठी प्रत्येक जिल्हयास रू. ०.२५ लाख प्रती प्रशिक्षण याप्रमाणे एका प्रशिक्षणासाठी रु.०.२५ लाख अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रशिक्षण आयोजित करताना एम आय डी एच/केंद्र शासन/राज्यशासन/एनएचएम या योजनामधील मंजुर प्रमाणकांनुसार खर्च करावा. जिल्हयांतर्गत बिगर रहिवासी शेतकरी प्रशिक्षणासाठी रक्कम रू. २५०/- प्रती मनुष्यदिवस तसेच जिल्हांतर्गत रहिवासी शेतकरी प्रशिक्षणासाठी रक्कम रू. ४००/- प्रती मनुष्यदिवस याप्रमाणे खर्च करण्यात यावा. प्रशिक्षणासाठी संबंधित विषयामधील तज्ञ, कृषि विद्यापीठे, कृषि संशोधन केंद्रे, राष्ट्रीय कृषि संशोधन केंद्रे इ. संस्थांमधील तज्ञ व्याख्यात्यांना बोलवावे. सदर प्रशिक्षणामध्ये सर्व प्रशिक्षणार्थींना संबंधित विषयाचे प्रशिक्षण साहित्य पुरविण्यात यावे. व्याख्यात्यांचे मानधन, त्यांच्या प्रवासासाठीची व्यवस्था, प्रशिक्षण साहित्य, बैठक व्यवस्था, अल्पोपहार इ. साठी सदरचे अनुदान खर्च करावे. प्रशिक्षणामध्ये पिकामधील दर्जेदार उत्पादन पद्धती (गॅप), एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, बंदी असलेली किटकनाशके, किटकनाशकांचे लेबलक्लेम, शेतक-याने ठेवावयाचे रेकॉर्ड, ग्रेपनेट, अनारनेट, मँगोनेट या संगणक प्रणाली वापरण्याबाबत मार्गदर्शन, नोंदणीकृत बाग तपासणी कशी करावी इ. विषयांबाबत व्याख्याने ठेवावीत. प्रशिक्षण आयोजित करताना खालीलप्रमाणे खर्च करावा.

**शेतकरी प्रशिक्षण (१०० शेतक-यांचे १ दिवसाचे प्रशिक्षण)**

| | |
|---|---|
| १. प्रशिक्षणार्थीसाठी बैठक व्यवस्था, स्टेजसंबंधी सुविधा, ध्वनीयंत्रणा, सादरीकरण सुविधा इ. | रू. ५०००/- |
| २. प्रशिक्षणार्थीसाठी चहा, अल्पोपहार इ. सुविधा (रू. ५० प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिवस) | रू. ५०००/- |
| ३. प्रशिक्षणासाठी व्याख्यात्यांचे मानधन, (८ व्याख्याते रू. १०००/- प्रती व्याख्यान प्रमाणे) | रू. ८०००/- |
| ४. व्याख्यात्यांसाठी वहातुक व निवास व्यवस्था | रू. ३०००/- |
| ५. प्रशिक्षणार्थीसाठी प्रशिक्षण साहित्य, झेरॉक्स, स्टेशनरी, फोटोग्राफी व इतर | रू. ४०००/- |
| **एकूण** | **रू. २५०००/-** |

**बाब क्र. - २ ब - तपासणी अधिकारी कार्यशाळा**

ग्रेपनेट, अनारनेट, मॅगोनेट, व्हेजनेट किंवा सदर पिकांच्या रिसिड्यू मॉनिटरींग प्लॅनमध्ये नियुक्त करण्यात येणा-या तपासणी अधिका-यांची कार्यशाळा घेऊन त्यांना संबंधित विषयाचे अद्यावत ज्ञान उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

त्यासाठी रू. २.०० लाख प्रती कार्यशाळा याप्रमाणे अनुदान देय आहे. राज्यात अशा एकूण ५ राज्यस्तरीय कार्यशाळा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात याव्यात.

| अ.क्र. | अंमलबजावणी यंत्रणा | कार्यशाळेचे ठिकाण | पीक |
|---|---|---|---|
| १ | जि.अ.कृ.अ., पुणे | पुणे | द्राक्ष (ग्रेपनेट) |
| २ | जि.अ.कृ.अ., सोलापूर/सांगली | सोलापूर | डाळिंब (अनारनेट) व द्राक्ष (ग्रेपनेट) |
| ३ | जि.अ.कृ.अ., सातारा | सातारा | भाजीपाला (व्हेजनेट) व द्राक्ष (ग्रेपनेट) |
| ४ | जि.अ.कृ.अ., रत्नागिरी | रत्नागिरी | आंबा (मँगोनेट) व भाजीपाला (व्हेजनेट) |
| ५ | जि.अ.कृ.अ., लातूर | नाशिक | आंबा (मँगोनेट) व द्राक्ष (ग्रेपनेट) |

उपरोक्त जिल्हयांनी राज्यातील सर्व नोंदणी अधिकारी, तपासणी अधिकारी यांची एक दिवसीय कार्यशाळा संबंधित पिकाच्या नोंदणीपूर्वी आयोजित करावी. यासाठी उपरोक्त जिल्हांना रक्कम रू. २.०० लाख प्रती कार्यशाळा अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. कार्यशाळा आयोजित करताना एम आय डी एच/ केंद्र शासन/राज्यशासन/एनएचएम मधील प्रमाणकांनुसार खर्च करावा. राज्यस्तरीय शेतकरी प्रशिक्षणासाठी रक्कम रू. १०००/- प्रती मनुष्यदिवस याप्रमाणे खर्च करण्यात यावा. कार्यशाळेसाठी संबंधित विषयामधील तज्ञ, कृषि विद्यापीठे, कृषि संशोधन केंद्रे, राष्ट्रीय कृषि संशोधन केंद्रे इ. संस्थांमधील तज्ञ व्याख्यात्यांना बोलवावे. सदर प्रशिक्षणामध्ये सर्व प्रशिक्षणार्थींना संबंधित विषयाचे प्रशिक्षण साहित्य पुरविण्यात यावे. व्याख्यात्यांचे मानधन, त्यांच्या प्रवासासाठीची व्यवस्था, प्रशिक्षण साहित्य, बैठक व्यवस्था, अल्पोपहार इ. साठी सदरचे अनुदान खर्च करावे. सदर कार्यशाळेचा कार्यक्रम, व्याख्याते, ठिकाण व वेळेबाबत कृषि आयुक्तालयाशी संपर्क करून त्यासंबंधीचे नियोजन करण्यात यावे. सदर कार्यशाळेमध्ये निर्यातक्षम पीक उत्पादनासाठी दर्जेदार उत्पादन पद्धती, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, बंदी असलेली किटकनाशके, किटकनाशकांचे लेबलक्लेम, आरएमपी अंतर्गत शेतक-याने ठेवावयाचे रेकॉर्ड, नोंदणीसाठी वापरण्यात येणा-या संगणक प्रणाली वापरण्याबाबत मार्गदर्शन, बाग / शेत तपासणी कशी करावी इ. विषयांबाबत व्याख्याने ठेवावीत. कार्यशाळा आयोजित करताना खालीलप्रमाणे खर्च करावा.

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

**अधिका-यांची राज्यस्तरीय कार्यशाळा (२०० अधिका-यांची एक दिवसाची कार्यशाळा)**

| | |
|---|---|
| १. प्रशिक्षणार्थीसाठी बैठक व्यवस्था (हॉल) | रू. २५,०००/- |
| २. स्टेजसंबंधी सुविधा, ध्वनीयंत्रणा, सादरीकरण सुविधा, उद्घाटनासाठी साहित्य इ. | रू. १०,०००/- |
| २. प्रशिक्षणार्थीसाठी चहा, अल्पोपहार, भोजन इ. सुविधा (रू. २०० प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिवस) | रू. ४०,०००/- |
| ३. प्रशिक्षणासाठी व्याख्यात्यांचे मानधन (८ व्याख्याते रू. ३०००/- प्रती व्याख्यान प्रमाणे) | रू. २४,०००/- |
| ४. व्याख्यात्यांसाठी वहातुक व निवास व्यवस्था (रू. ३००० प्रती व्याख्याताप्रमाणे) | रू. २४,०००/- |
| ५. प्रशिक्षणार्थीसाठी निवास व्यवस्था (रू. १५०० प्रती सुट – किमान २० सुट उपलब्ध करणे) | रू. ३०,०००/- |
| ६. प्रशिक्षण साहित्य, झेरॉक्स, स्टेशनरी, किटबॅग व इतर (रू. २०० प्रती प्रशिक्षणार्थी) | रू. ४०,०००/- |
| ७. फोटोग्राफी, व्हीडीओ शुटींग व इतर किरकोळ खर्च | रू. ७०००/- |
| **एकूण** | **रू. २,००,०००/-** |

**बाब क्र. - २ अ - फायटोसॅनिटरी ॲथारिटींचे प्रशिक्षण**

राज्यातील फायटोसॅनिटरी ॲथारिटी व फायटोसॅनिटरी निरीक्षक यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी रक्कम रू. ०.५० लाख तरतूद उपलब्ध आहे. याबाबतची कार्यवाही कृषि उपसंचालक (फलो ३) यांनी करावी. सदर प्रशिक्षणामध्ये फायटोसॅनिटरी प्राधिकारी व त्यांचे अधिनस्त नियुक्त फायटोसॅनिटरी निरीक्षक यांना प्रशिक्षणार्थी म्हणून निवडावे. सदर प्रशिक्षणे पुणे येथे किंवा सुविधा उपलब्ध असलेल्या पॅकहाऊसच्या ठिकाणी घ्यावे. प्रशिक्षणामध्ये आंतरराष्ट्रीय पीक संरक्षण करार, प्लँट क्वारंटाईन इन्फॉर्मेशन सिस्टीम, संगणक प्रणालीचा वापर, ग्रेपनेट संगणक प्रणालीमधून फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही, इन्टरनॅशनल सॅनिटरी व फायटोसॅनिटरी मेजर्स, विविध पिकांवरील क्वारंटाईन कीडींची ओळख, स्टॅण्डर्ड ऑपरेटींग प्रोसेजर, निर्यातक्षम मालाची तपासणी इ. विषयावरील व्याख्याने आयोजित करण्यात यावीत. प्रशिक्षण आयोजित करताना खालीलप्रमाणे खर्च करावा.

**फायटोसॅनिटरी ॲथारिटीचे प्रशिक्षण (२५ अधिका-यांचे १ दिवसांचे प्रशिक्षण)**

| | |
|---|---|
| १. प्रशिक्षणार्थीसाठी बैठक व्यवस्था, स्टेजसंबंधी सुविधा, ध्वनीयंत्रणा, सादरीकरण सुविधा इ. | रू. ५०००/- |
| २. प्रशिक्षणार्थीसाठी चहा, अल्पोपहार इ. सुविधा (रू. १५० प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिवस) | रू. ३७५०/- |
| ३. प्रशिक्षणासाठी व्याख्यात्यांचे मानधन, (८ व्याख्याते रू. १०००/- प्रती व्याख्यान प्रमाणे) | रू. ८०००/- |
| ४. व्याख्यात्यांसाठी वहातुक व निवास व्यवस्था | रू. ५०००/- |
| ५. प्रशिक्षणार्थीसाठी प्रशिक्षण साहित्य, झेरॉक्स, स्टेशनरी, फोटोग्राफी व इतर | रू. ३२५०/- |
| **एकूण** | **रू. २५०००/-** |

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

**बाब क्र. – २ ब - फायटोसॅनिटरी ॲथारिटींसाठी उपकरणे व पायाभूत सोयीसुविधा**

राज्यात पुणे (कृषि आयुक्तालय), नाशिक, सांगली, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, अमरावती या जिल्हांच्या ठिकाणी फायटोसॅनिटरी ॲथारिटी कार्यरत असून त्यांना निर्यात होणा-या कृषि मालाची तपासणी करून फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र दयावे लागते. सदर निर्यात होणा-या कृषि मालाची कीडरोग मुक्त असल्याची खात्री करण्यासाठी आवश्यक असणा-या सुविधा, उपकरणे इ. च्या खरेदीसाठी रक्कम रू. १.०० लाख प्रती जिल्हा रक्कम याप्रमाणे मंजूर करण्यात आलेली आहे. उपरोक्त जिल्हयांनी त्यांचे जिल्हयातील फायटोसॅनिटरी ॲथारिटी व त्यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या फायटोसॅनिटरी निरीक्षकांसाठी बॅगसह तपासणी किट, डबल लेन्स इल्युमिनेटेड मॅग्नोस्कोप, व्हायरस तपासणीसाठी इलिसा किट/ॲग्री स्ट्रीप, ब्रिक्स सॅक्रोमीटर, कीड व तण बियाणे अल्बम, कॅमेरा इ. उपकरणे आवश्यकतेनुसार विहीत पद्धतीने खरेदी करावीत. खरेदी केलेल्या उपकरणांच्या वापराबाबत संबंधीतांना प्रशिक्षित करावे. तसेच खरेदी केलेल्या उपकरणांची नोंदवहीत नोंद करावी.

**बाब क्र. – ३ - प्रकाशने, प्रशिक्षण साहित्य, छपाई इ.**

निर्यातक्षम द्राक्ष, डाळिंब, आंबा व भाजीपाला यांचे उत्पादन तंत्रज्ञान, एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन, दर्जेदार उत्पादन पद्धती, निर्यातीसाठी असलेली संधी, फायटोसॅनिटरी प्रमाणीकरणासंबंधी मार्गदर्शनपर पुस्तिका इ. बाबत प्रकाशने निर्मिती/खरेदी करणे, शेतकरी नोंदणीसाठी आवश्यक फाॅर्म छपाई करणे, प्रशिक्षण साहित्य तयार करणे इ. साठी रक्कम रू. ५.०० लाख मंजूर आहे. याबाबतची कार्यवाही कृषि उपसंचालक (फलो ३) यांनी करावी.

**बाब क्र. – ४ - तपासणी अधिका-यांना फिरती व स्टेशनरी सुविधांसाठी रक्कम**

ग्रेपनेटमध्ये द्राक्ष उत्पादकांचे नोंदणीसाठी अर्ज भरून घेणे, त्यांच्या बागांची दोन वेळा तपासणी करणे, द्राक्ष उत्पादकांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे, त्याचेकडे ग्रेपनेटमधील सूचनांनुसार पीक उत्पादन व कीडरोग नियंत्रण पद्धतींचे रेकॉर्ड ठेवणे यासाठी प्रक्षेत्र स्तरावरील तपासणी अधिका-यांना स्वताचे काम सांभाळून सदर कामे करावी लागतात. त्यासाठी त्याला किमान ४ ते ५ वेळा शेतक-यांच्या शेतावर जावे लागते. त्यासाठी त्यांचा वैयक्तीक खर्च होत असतो. त्याचे हे तपासणीचे काम सुलभ व विहीत वेळेत व्हावे यासाठी त्यांना यासाठी करावी लागणारी फिरती, झेरॉक्स, इंटरनेट कनेक्टीव्हीटी, दूरध्वनी, स्टेशनरी इ. बाबतचा खर्च त्यांना देण्यात यावा. त्यांनी बागांची नोंदणी केलेल्या कामासाठी प्रती बाग रू. १०.०० या मर्यादेमध्ये त्यांना रक्कम अदा करण्यात यावी. त्यांना हा खर्च तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेल्या खर्चाची प्रतीपूर्ती तालुका कृषि अधिकारी स्तरावर करण्यात यावी.

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

सदर मानधन हे फक्त अपेडाने मंजूर केलेल्या रिसिड्यू मॉनिटरींग प्लॅन फॅार ग्रेप्स (ग्रेपनेट) या प्रणालीवर युरोपीय युनियनला निर्यात करण्यासाठी द्राक्ष लागवड केलेल्या व ग्रेपनेट प्रणालीवर नोंदणी करण्यात येत असलेल्या शेतक-यांसाठीच संबंधित तपासणी अधिका-यांना देण्यात यावे.

याबाबत मागील वर्षाचा अनुभव व आकडेवारी विचारात घेऊन संबंधित जिल्ह्यांनी याबाबतच्या रकमेची अगावू मागणी करावी. मागणी न केलेल्या जिल्हयांना मानधनासाठी रक्कम कमी मिळाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी जबाबदार राहतील.

**बाब क्र. – ५ - नोंदणी व तपासणी अधिका-यांसाठी आयटी सुविधा**

राज्यात मँगोनेट, व्हेजनेट, ग्रेपनेट, अनारनेट राबविणारे २० जिल्हे असून त्यांना द्राक्ष, डाळिंब, आंबा व भाजीपाला पिकांच्या बागांची/शेतांची नोंदणी करणे, त्यांना नोंदणी प्रमाणपत्र देणे, तपासणीचे अहवाल ऑनलाईन करणे, तपासणी अधिका-यांचे सनियंत्रण करणे इ. विविध कामासाठी आयटी सुविधा असणे आवश्यक आहे. सदर आयटी सुविधा जसे की संगणक, प्रिंटर, स्कॅनर, नेट कनेक्टीव्हीटी, टॅब पामटॅाप, लॅपटॅाप, इ. आवश्यक असणा-या सुविधांच्या खरेदीसाठी रक्कम रू. ०.९० लाख प्रती जिल्हा याप्रमाणे मंजूर करण्यात आलेली आहे. उपरोक्त जिल्हयांनी त्यांचे स्तरावर विहीत कार्यपद्धतीने आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करावे. खरेदी केलेल्या उपकरणांच्या वापराबाबत संबंधीतांना प्रशिक्षित करावे तसेच खरेदी केलेल्या उपकरणांची संबंधित नोंदवहीत नोंद करावी. उर्वरित रक्कम रू. १.५० लाख ही आयुक्तालय स्तरावर ठेवण्यात आली असून त्याबाबतची कार्यवाही कृषि उपसंचालक (फलो ३) यांनी करावी.

**बाब क्र. – ६ - आकस्मिक व इतर**

या बाबीखाली रक्कम रू. १.०० लाख मंजूर असून त्याबाबतची कार्यवाही कृषि उपसंचालक (फलो ३) यांनी करावी. सदर निधी सीड स्कॅनर मशीनचे वार्षिक देखभाल दुरूस्तीचे शुल्क, प्रिंटींगसाठीचे प्रिंटरचे टोनर खरेदी व रिफिलींगचा खर्च, विविध बैठकांसाठीच्या आयोजनावरील खर्च, स्टेशनरी, झेरॉक्सिंग इ. कामाच्या आकस्मिक खर्चासाठी वापरण्यात यावा.

उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून केलेल्या कार्यवाहीबाबत कृषि आयुक्तालयास दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अहवाल सादर करावा. राज्यस्तरावर सदर योजनेची सनियंत्रण करणेकरिता फलोत्पादन संचालक यांचे कार्यालयातील कृषि उपसंचालक (फलो ३) यांची नोडल अधिकारी /समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

**मॅंगोनेट**

राज्यातून मोठया प्रमाणात युरोपियन व इतर देशांनाअ ांबा फळांची निर्यात करण्यांत येते. युरोपियन व इतर देशांनाअ ांबा निर्यातीकरीता प्रामुख्याने किडनाशकउ र्वरितअ ंश व किड व रोग मुक्त उत्पादनांची हमी देणे आवश्यकअ सल्यामुळेअ पेडा व कृषि विभागाच्या समन्वयाने राज्यात रेसिडयु मॉनिटरिंग प्लॅनची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यांत येणारअ ाहे. सदरचे काम संपूर्णतः वेबसाईटद्वारे करण्यांत येणारअ सून त्याबाबतची संगणक प्रणालीअ पेडा संस्थेमार्फत विकसित करण्यात येतअ ाहे. त्यामध्ये निर्यातक्षमअ ांबा बागांची नोंदणी, त्यांची तपासणी तसेच शेतक-यांना मार्गदर्शन करणे इ. कामे कृषि विभागामार्फत करण्यात येतअ ाहेत.

आंब्यामधील किडनाशके उर्वरित अंश नियंत्रणाबाबत अपेडा, नवी दिल्ली यांनीअ ांबा पिकासाठी रेसिड्यू मॉनिटरींग प्लॅन तयार करून मंजूरीसाठी सादर केलेलाअ ाहे. सदर रिसिड्यू मॉनिटरींग प्लॅनमध्ये दिलेल्या सुचना तसेच इतर अनुषंगिक बाबींचा विचार करून सन २०१५-१६ या वर्षामध्ये युरोपीयन व इतर देशांना निर्यात होणा-या आंबा फळांमध्ये किडनाशके उर्वरित अंश नियंत्रणाबाबत व किडमुक्त कृषि उत्पादनाची हमी देण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना तयार करण्यांत आल्या असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**१.निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी**

सन २०१५-१६ या वर्षामध्ये युरोपीयन व इतर देशांना आंबा निर्यात करू इच्छिणा-या शेतक-यांच्या बागांची मॅंगोनेट संगणक प्रणालीद्वारे नोंदणी करण्याकरिता खालील जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांना नोंदणी अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | प्राधिकृत केलेले नोंदणी अधिकारी |
|---|---|---|
| १ | अहमदनगर | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर |
| २ | पुणे | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे |
| ३ | सोलापूर | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर |
| ४ | नाशिक | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नाशिक |
| ५ | रायगड | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रायगड |
| ६ | रत्नागिरी | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रत्नागिरी |
| ७ | सिंधुदूर्ग | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सिंधुदूर्ग |
| ८ | ठाणे | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ठाणे |
| ९ | पालघर | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पालघर |
| १० | उस्मानाबाद | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद |

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

| | | |
|---|---|---|
| ११ | लातूर | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, लातूर |
| १२ | बीड | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड |
| १३ | जालना | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जालना |
| १४ | औरंगाबाद | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद |
| १५ | बुलडाणा | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, **बुलढाणा** |

**नोंदणी अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची कर्तव्य व जबाबदा-या.**

- नोंदणी करण्याकरिता शेतक-यांनी करावयाचाअ र्ज ३ प्रतीत (Triplicate) छपाई करून घेणे
- तपासणी प्रपत्र ४ अ व ४ ब तीन प्रतीत (Triplicate) छपाई करून घेणे
- शेतक-यांने ठेवावयाचे रेकार्ड बाबतचे प्रपत्र तीन प्रतीत (Triplicate) छपाई करून घेणे
- मॅंगोनेट द्वारे देण्यात येणा-या नोंदणी प्रमाणपत्राकरिता हिरव्या रंगाचा पेपर वापरणे
- युरोपीयन देशांना व इतर देशांना निर्यात करण्याकरिता नोंदणी केलेल्या आंबा बागायतदारांना बागेवरील किडी व रोगांचे नियंत्रण करण्याकरिता लेबल क्लेमनुसार औषधे वापरण्याबाबत शेतक-यांना प्रशिक्षित करणे.
- **आंबा बागांच्या नोंदणीचा कालावधी दिनांक १५ नोव्हेंबर २०१५ ते** १५ **जानेवारी,** २०१६ **व विलंब शुल्कासह** ३१ **जानेवारी २०१६ राहील.**

**१. निर्यातक्षम आंबा बागांची तपासणी**

सन २०१५-१६ या वर्षात निर्यातक्षम आंबा बागांची तपासणी करण्याकरिता संबंधित जिल्ह्यामध्ये ज्या ठिकाणी आंबा बागांचे क्षेत्र आहे. अशा ठिकाणी संबंधित जिल्हानिहाय स्थानिक मंडल कृषि अधिकारी यांची तपासणी अधिकारी म्हणून नियुक्ती करावी व त्यांची नावे व मोबाइल क्रमांक कृषि आयुक्तालयास कळवावेत. तसेच हार्टसॅप अंतर्गत आंबा पिकावरील किडी व रोगाचे सर्वेक्षण करण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या स्काउटची मदत सदर कामासाठी घ्यावी.

**तपासणी अधिका-यांची कर्तव्ये व जबाबदा-या**

१. निर्यातक्षम आंबा बागांमधील उर्वरित अंश नियंत्रणाकरिता शेतक-यांना मार्गदर्शन करण्यासाठी दोन तपासण्या विहीत करण्यांत आलेल्या आहेत. पहिली तपासणी नोंदणी प्रमाणपत्र देण्यापूर्वी करावयाची आहे (प्रपत्र ४ अ). दुसरी तपासणी माल काढण्यापूर्वी २० दिवस अगोदर करावयाची आहे (प्रपत्र ४ ब).

२. निर्यातक्षम आंबा बागांची तपासणी करण्याकरिता प्रपत्र ४ अ व प्रपत्र ४ ब विहीत करण्यांत आलेले आहेत. त्या विहीत केलेल्या प्रपत्रामध्ये संबंधित नोंदणीकृत आंबा बागांची तपासणी अधिका-याने तपासणी

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

करून तपासणीचा अहवाल संबंधित आंबा बागायतदार यांना देवून त्याची महिती अपेडाच्या वेबसाईटवर मॅंगोनेट कार्यान्वित झाल्यानंतर तालुकास्तरावर भरावयाची आहे. तसेच ४ अ व ४ ब वर शेतकरी व तपासणी अधिका-याने स्वाक्षरी करून पुर्ण पत्ता व मोबाईल क्रमांक टाकावा.

३. प्रपत्र १ समवेत प्रक्षेत्राचा नकाशा असावा. यामध्ये चतु:सीमा, प्रक्षेत्राजवळची खुण व नकाशावर तपासणी अधिका-यांची स्वाक्षरी असावी.

४. तपासणी अधिका-यांने त्याच्या कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत सर्व आंबा बागायतदारांना निर्यातक्षम आंबा बागेमधील उर्वरित किडनाशके अंश नियंत्रणाकरिता केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालील मुद्यांवर वेळोवेळी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

अ) लेबल क्लेमनुसार औषधांचा वापर करणे.

ब) अप्रमाणित, शिफारस न केलेले किंवा बंदी घातलेल्या औषधांचा वापर न करणे.

क) उर्वरित अंश तपासणीकरिता नमुने घेतल्यानंतर औषधाची फवारणी न करणे.

ड) नोंदणी अधिका-यांच्या परवानगी शिवाय नोंदणी प्रमाणपत्रात कोणताही बदल न करणे.

इ) आंबा बागांवरील किडी व रोगांचे नियंत्रणाकरिता वापरलेल्या औषधांचे विहीत नमुन्यात (प्रपत्र२अ) रेकॉर्ड ठेवणे.

फ) ज्या आंबा बागांच्या बाबतीत अलर्ट जारी करण्यात येतील, त्यामधील आंब्यांची परत तपासणी केली जात नाही तोपर्यंत सदर मालाची निर्यात होणार नाही याची दक्षता घेणे.

## ३. आंबा बागा नोंदणी अतंर्गत सन २०१५-१६ साठी कृति आराखडा

- नोंदणीकृत निर्यातक्षम आंबा बागांची तपासणी करण्याकरिता संबंधितअ ांबा बाग ज्यांच्या कार्यक्षेत्रात आहेत त्या मंडल कृषिअ धिका-यांना तपासणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येतअ ाहे. ज्या ठिकाणी तपासणी अधिकारी नियुक्त केलेला नसेलअ शा ठिकाणी गरजेनुसार नोंदणीअ धिका-यांनी तपासणीअ धिकारी नियुक्त करून त्याचे नाव कृषिअ ायुक्तालयास कळवावे. तसेचअ शाप्रकारचीअ डचण निर्माण होऊ नये म्हणून संबंधित जिल्ह्यातील जि.अ.कृ.अ. कार्यालयातील कृषिउ पसंचालक यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात तपासणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येतअ ाहे.

- जिल्हाअ धिक्षक कृषिअ धिकारी रायगड. रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर,अ हमदनगर, पुणे, सोलापूर, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, औरंगाबाद, बीड, जालना, **बुलढाणा** यांनी दिनांक ५ डिसेंबर,२०१ ५ ते १५ जानेवारी,२०१ ६ या कालावधी दरम्यानअ ापल्या जिल्हयातील तपासणीअ धिकारी व समन्वयअ धिका-यांची मॅंगोनेटअ ंमलबजावणीबाबत कार्यशाळा/प्रशिक्षणअ ायोजित करावे.
- दिनांक ५ डिसेंबर, २०१५ ते १५ जानेवारी, २०१६ या कालावधीत तालुकास्तरावर खास मोहीम घेवून आंबाबागांची नोंदणी करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.
- नोंदणी केलेल्या आंबा बागायतदारांना ३१ जानेवारी, २०१६ पूर्वी नोंदणी प्रमाणपत्र खास मोहीम घेवून उपलब्ध करून द्यावे.
- दिनांक ५ डिसेंबर, २०१५ ते १५ जानेवारी, २०१६ या कालावधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रायगड. रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, अहमदनगर, पुणे, सोलापूर, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, औरंगाबाद, बीड, जालना, **बुलढाणा** यांनी निर्यातक्षम नोंदणीकृत आंबा बागायतदारांकरिता तसेच अधिका-यांकरिता प्रशिक्षणे आयोजित करावीत.
- मॅंगोनेट संगणक प्रणाली अंतर्गत नोंदणी केलेल्या निर्यातक्षम आंबा बागांची ४ ब मध्ये तपासणी करणेकरिता खास मोहीम राबवून तपासणी अहवाल मॅंगोनेट संगणक प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर अद्यावत करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

**४. समन्वय अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदा-या**

युरोपीयन देशांना आंबा निर्यातीकरिता किडनाशके उर्वरित अंश नियंत्रण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खालील अधिका-यांना समन्वय अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांची कर्तव्य व जबाबदा-या खालील प्रमाणे आहेत.

- **कृषि आयुक्तालयस्तर :- संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे कार्यालयातील कृषि उपसंचालक (फलो-३) व तंत्र अधिकारी (फलो ३)**

  मार्गदर्शक सुचना निर्गमित करणे, जिल्हा व तालुका स्तरावरील आंबाबागांच्या नोंदणीच्या कामाचे सनियंत्रण करणे, नोंदणीच्या कामाचा आढावा दर १५ दिवसांनी आयुक्त, कृषि व संचालक, फलोत्पादन यांना सादर करणे

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

- **जिल्हास्तर :- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक**
  सर्व अधिनस्त तालुका कृषि अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातंर्गत करावयाच्या आंबा बागांच्या नोंदणीच्या कामाचे सनियंत्रण करणे व याबाबतचा आढावा दर १५ दिवसांनी संचालक, फलोत्पादन यांना सादर करणे.
- **तालुकास्तर :- संबंधित तालुका कृषि अधिकारी**

सर्व निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी करणे, आंबा उत्पादकांकडून बागेची नोंदणी करणेकरिता अर्ज घेणे, निर्यातक्षम बागांची प्रपत्र ४ अ व प्रपत्र ४ ब मध्ये तपासणी करणे युरोपीयन देशांना निर्यात करण्याकरिता नोंदणी केलेल्या आंबा बागायतदारांना आंबा बागेवरील किडी व रोगांचे नियंत्रण करण्याकरिता लेबल क्लेमनुसार औषधे वापरण्याबाबत मार्गदर्शन करणे व त्याची नोंद प्रपत्र - २ अ मध्ये ठेवण्याबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करणे. तपासणी अधिका-यांच्या कामाचे सनियंत्रण करणे व याबाबतचा आढावा दर १५ दिवसांनी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांना सादर करणे.सदर कामासाठी संबंधित मंडल / तालुक्यामध्ये हॅर्टसॅप कार्यक्रमांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या स्काऊटची मदत घ्यावी.

उपरोक्त प्रमाणे विविध बाबींसाठीचा निधी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मॅंगोनेट, व्हेजनेट, अनारनेट, ग्रेपनेट व फायटोसॅनिटरी ॲथॉरिटी यांचे बळकटीकरणाद्वारे निर्यातीस प्रोत्साहन देणे या योजनेमध्ये सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर निधी आरटीजीएसद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार असल्यामुळे बॅंकेचे नांव व खाते क्रमांक ही त्वरित पाठवावा. सदर कामाचा आढावा दर महिन्याच्या मासिक सभेत घेण्यात येणार आहे. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील अधिकाधिक बागांची नोंदणी करावी.

sd/-

**संचालक, फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

---

# संचालक, फलोत्पादन कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००५

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल – phytocell@gmail.com

जा.क्र. कृषि निर्यात कक्ष/ निर्यात/फलो ३/**१९४१**/२०१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५,
इमेल - phytocell@gmail.com
दिनांक – **२९.०६.२०१५**

**प्रती**

**१. विभागीय कृषि सहसंचालक,**
कोकण विभाग, ठाणे / नाशिक विभाग, नाशिक / पुणे विभाग, पुणे /कोल्हापूर विभाग, कोल्हापूर /औरंगाबाद विभाग,औरंगाबाद/ लातूर विभाग, लातूर / अमरावती विभाग, अमरावती

**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग,पालघर नाशिक, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड,जालना, उस्मानाबाद, लातूर, परभणी, बुलढाणा, अमरावती,

**प्रत :-** **१.** मा.अतिरिक्त मुख्य सचिव ( कृषि व पणन) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय- विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर

**२.** मा. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ यांना माहितीसाठी सविनय सादर

**३.** संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी फार्म, पुणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी /-उपरोक्त योजनेंतर्गत प्रशिक्षणासाठी क्षेत्रीय स्तरावरील अधिका-यांना आपलेकडील तज्ञ व्याख्याते उपलब्ध करावेत ही विनंती.

**४.** संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ५

**५.** विश्लेषण रसायनशास्त्रज्ञ, किडनाशके उर्वरीत अंश तपासणी प्रयोगशाळा, पुणे-५ / किडनाशक उर्वरीत अंश तपासणी प्रयोगशाळा, बीज परिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाच्यावर, नागपूर विद्यापीठासमोर, सिव्हील लाईन, नागपूर-१

sd/-
**संचालक, फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

# संचालक, फलोत्पादन कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००५

फोन- ०२०-२५५३७९५७ फॅक्स ०२०-२५५३७५६५ ईमेल — phytocell@gmail.com

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मँगोनेट, व्हेजनेट विकसन, ग्रेपनेट, अनारनेट, फायटोसॅनिटरी ॲथारिटी यांचे बळकटीकरण याद्वारे निर्यातीस प्रोत्साहन देणे योजना सन 2015-16 साठी अनुदान तपशील (रू. लाखामध्ये)

| बाब तपशील | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | शेतकरी प्रशिक्षण @ 0.25 लाख प्रती जिल्हा ( लक्षांक ) | | तपासणी अधिकारी कार्यशाळा @ 2.00 लाख प्रती कार्यशाळा ( लक्षांक ) | | फायटोसॅनिटरी ॲथारिटींचे प्रशिक्षण @ 0.25 लाख प्रती प्रशिक्षण ( लक्षांक ) | | फायटोसॅनिटरी ॲथारिटींसाठी उपकरणे व पायाभूत सोयीसुविधा ( लक्षांक ) | | प्रकाशने, प्रशिक्षण साहित्य, छपाई इ. ( लक्षांक ) | | तपासणी अधिका-यांना फिरती, स्टेशनरी इ. विविध सुविधांसाठी रक्कम ( लक्षांक ) | | नोंदणी व तपासणी अधिका-यांसाठी आयटी सुविधा ( लक्षांक ) | | आकस्मिक व इतर ( लक्षांक ) | | एकुण ( लक्षांक ) | |
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| | 2 | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| 1 | ठाणे | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 2 | पालघर | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 3 | रायगड | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 4 | रत्नागिरी | १ | ०.२५ | १ | २.०० | ० | ०.०० | ५ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | १० | ४.१५ |
| 5 | सिंधुदूर्ग | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ५ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ९ | २.१५ |
| | **विभाग एकूण** | **५** | **१.२५** | **१** | **२.००** | **०** | **०.००** | **१०** | **२.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **१५** | **४.५०** | **०** | **०.००** | **३१** | **९.७५** |
| 6 | नाशिक | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ५ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ९ | २.१५ |
| 7 | जळगाव | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| | **विभाग एकूण** | **२** | **०.५०** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **५** | **१.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **६** | **१.८०** | **०** | **०.००** | **१३** | **३.३०** |
| 8 | पुणे | १ | ०.२५ | १ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ५ | ३.१५ |
| 9 | अहमदनगर | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 10 | सोलापूर | १ | ०.२५ | १ | २.०० | ० | ०.०० | ५ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | १० | ४.१५ |
| | **विभाग एकूण** | **३** | **०.७५** | **२** | **४.००** | **०** | **०.००** | **५** | **१.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **९** | **२.७०** | **०** | **०.००** | **१९** | **८.४५** |
| 11 | सातारा | १ | ०.२५ | १ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ५ | ३.१५ |
| 12 | सांगली | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ५ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ९ | २.१५ |
| | **विभाग एकूण** | **२** | **०.५०** | **१** | **२.००** | **०** | **०.००** | **५** | **१.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **६** | **१.८०** | **०** | **०.००** | **१४** | **५.३०** |
| 13 | औरंगाबाद | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 14 | बीड | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 15 | जालना | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| | **विभाग एकूण** | **३** | **०.७५** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **९** | **२.७०** | **०** | **०.००** | **१२** | **३.४५** |
| 16 | उस्मानाबाद | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 17 | लातूर | १ | ०.२५ | १ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ५ | ३.१५ |
| 18 | परभणी | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| | **विभाग एकूण** | **३** | **०.७५** | **१** | **२.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **९** | **२.७०** | **०** | **०.००** | **१३** | **५.४५** |
| 19 | बुलढाणा | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ४ | १.१५ |
| 20 | अमरावती | १ | ०.२५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ५ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३ | ०.९० | ० | ०.०० | ९ | २.१५ |
| | **विभाग एकूण** | **२** | **०.५०** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **५** | **१.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **६** | **१.८०** | **०** | **०.००** | **१३** | **३.३०** |
| 21 | आयुक्तालय स्तर | ० | ०.०० | ० | ०.०० | २ | ०.५० | ५ | १.०० | १ | ५.०० | १३ | २.०० | ४ | १.५० | १ | १.०० | २६ | ११.०० |
| | **एकूण राज्य** | **२०.००** | **५.००** | **५.००** | **१०.००** | **२.००** | **०.५०** | **३५.००** | **७.००** | **१.००** | **५.००** | **१३.००** | **२.००** | **६४.००** | **१९.५०** | **१.००** | **१.००** | **१४१** | **५०.००** |